# पोलीस आयुक्तालय, नवी मुंबई

## प्रेसनोट

CB/48/2025

गुन्हे शाखा, नवी मुंबई | दिनांक २१/०८/२०२५

---

**स्कॉर्पियो कार चोरणा-या सराईत गुन्हेगारांना गुन्हे शाखा, कक्ष-१ कडुन अटक**

---

खांदेश्वर पोलीस ठाणे गु.र.नं. १७१/२०२५, भा.न्या.सं.कलम ३०३(२) या गुन्हयाचा समांतर तपास गुन्हे शाखा, कक्ष-१, नवी मुंबई कडील अधिकारी व अमंलदार करीत असताना, गुन्हयाचे घटनास्थळ परिसरातील मार्गावरील सीसीटीव्ही फुटेजची पाहणी करून त्यातील आरोपी निष्पन्न केले. सदरचे आरोपी हे मुळचे राजस्थान येथील असल्याचे तांत्रिक तपासात निष्पन्न झाले. सपोनि बनकर व तपास पथकाने आरोपींचा राज्य- राजस्थान, गुजरात व महाराष्ट्रात शोध घेतला, परंतु आरोपी वारंवार ठावठिकाणा बदलत असल्याने ते मिळुन येत नव्हते.

दिनांक १८/०८/२०२५ रोजी नमूद आरोपी हे कल्याण व भिवंडी परिसरात आले असल्याची गुप्त बातमीदारांकडून माहिती मिळाल्यामुळे पोलीस पथकाने सापळा लावुन दिनांक १९/०८/२०२५ रोजी सकाळी टेमघर, कल्याण भिवंडी रोड येथुन आरोपी (१) सुरेश कालुराम उदाणी, वय ३० वर्षे (२) रिचपाल पप्पुराम बिष्णोई, वय २४ वर्षे, दोघे राह. ता. लोहावत, जि. फलोदी, राज्य राजस्थान यांना तपासकामी ताब्यात घेतले. नमूद आरोपींना विश्वासात घेवून त्यांचेकडे सदर गुन्हयाचे अनुषंगाने तपास करता त्यांनी सदरचा गुन्हा संगनमताने केल्याचे कबूल केले.

दोन्ही आरोपींचा गुन्हयात सक्रिय सहभाग अढळ्याने त्यांना दिनांक १९/०८/२०२५ रोजी अटक केली असुन मा. न्यायालयाने दिनांक २२/८/२०२५ पर्यत पोलीस कोठडी मंजुर आहे.

- अटक आरोपी सुरेश कालुराम उदाणी याचेविरुध्द,
  १) महात्मा फुले चौक पोलीस ठाणे, कल्याण, ठाणे गु.र.क्र. ३२२/२०१९, भादवि कलम ४२०,४०६.
  २) वायडी नगर पोलीस ठाणे, मध्यप्रदेश, गु.र.क्र. २३८/२०२२, एनडीपीएस कलम १५,८.
  ३) कोथरुड पोलीस ठाणे, पुणे गु.र.क्र. ०७/२०२२, भादवि ३७९.
  ४) कल्याण तालुका पो ठाणे, गु.र.क्र. ४८/२०२५, बीएनएस कलम ३०३(२) प्रमाणे गुन्हे दाखल असून आरोपी हा स्कॉर्पियो चोरणारा सराईत गुन्हेगार आहे.

अटक आरोपी यांनी इतर ठिकाणी अशा प्रकारचे गुन्हे केले आहेत अगर कसे याबाबत तपास सुरु आहे. गुन्हयाचा पुढील तपास सपोनि निलेश बनकर, गुन्हेशाखा, कक्ष-१ हे करीत आहेत.

सदर कारवाई श्री.सचिन गुंजाळ, पोलीस उप आयुक्त, (गुन्हे), श्री. अजयकुमार लांडगे, सहा. पोलीस आयुक्त, (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हेशाखा, कक्ष-१ वाशी वपोनि/ तानाजी भगत, सपोनि/निलेश बनकर, सपोउपनिरी /विश्वास पवार, पोहवा/ आतिश कदम, पोना/अझहर मिर्झा, पोशि/ सचिन पाटील यांनी केली आहे.

★★★★★★★★★★★